भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय २०१२-१३/२०**
**डीएनबीएस(पीडी)सीसी.क्र.२९/एससीआरसी/२६.०३.००१/२०१२-१३** **जुलै ०२, २०१२**

**जून ३०, २०१२ पर्यंत सुधारित अधिसूचित सिक्युरिटायझेशन कंपन्या किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपन्याद्वारे, कर्जदाराचा धंदा ताब्यात घेणे किंवा त्यात बदल करणे (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे २०१०**

आपणस माहितच आहे की ह्या विषयावरील सर्व सूचना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी भारतीय रिझर्व बँक अद्यावत केलेली परिपत्रके/अधिसूचना देत असते जून ३०, २०१२ रोजी अद्यावत केलेल्या अधिसूचना डीएनबीएस/पीडी (एससी/आरसी) क्र. ७/सीजीएम(एएसआर) २०१० दि. एप्रिल २१, २०१० मधील सूचना खाली दिल्या आहेत. ही अद्यावत केलेली अधिसूचना रिझर्व बँकेच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in) टाकण्यात आली आहे.

आपली,

(उमा सुब्रम्हण्यम)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

गैर बँकिंग पर्यवेक्षण, केंद्रीय कार्यालय, २ री मंजिल, सेंटर १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई – ४०० ००५
फोन नं.: २२१८ २५२६, २२१८ ९१३१ ; फॅक्स नं.: २२१५ ०५४०, २२१६ २७६८ ; ई-मेल : dnbs@rbi.org.in

**सिक्युरिटायझेशन कंपन्या किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपन्याद्वारे, कर्जदाराचा धंदा ताब्यात घेणे किंवा त्यात बदल करणे (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे २०१० वरील अधिसूचना**

नाणेविषयक धोरणाच्या निवेदनामध्ये केलेल्या घोषणेनुसार, कर्जदाराचा धंदा ताब्यात घेऊन किंवा त्यात बदल करुन कर्जदारांकडून कर्जवसुली करण्यासाठी सिक्युरिटायझेशन किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांना(एससी/आरसी) कर्जदाराच्या धंद्याचे व्यवस्थापन करण्यासाठी, रिझर्व बँक, येथे, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, २००२ (एसएआरएफएईएसआय)च्या कलम ९(अ) खाली तयार केलेली मार्गदर्शक तत्वे अधिसूचित करत आहे.

**१. लघु शीर्षक व सुरुवात**

अ) ही मार्गदर्शक तत्वे ‘‘सिक्युरिटायझेशन कंपन्या किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपन्याद्वारे, कर्जदाराचा धंदा ताब्यात घेणे किंवा त्यात बदल करणे (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे २०१०’’ म्हणून ओळखली जातील.

ब) ही मार्गदर्शक तत्वे एप्रिल २१,२०१० पासून जारी होतील.

<u>स्पष्टीकरणः</u>

ह्या मार्गदर्शक तत्वांसंबंधाने :

१) ‘व्यवस्थापनातील बदल’ म्हणजे, एससी/आरसीच्या सांगण्यानुसार, कर्जदाराद्वारे, त्या कर्जदाराच्या आणि/किंवा संबंधित व्यक्तिच्या उद्योगधंद्याच्या संपूर्ण किंवा लक्षणीय संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी असलेल्या व्यक्ती बदलणे.

२) ‘व्यवस्थापन ताब्यात घेणे’ म्हणजे, त्या एससी/आरसीद्वारा, कर्जदाराच्या व्यवस्थापनामधील व्यक्तींमध्ये बदल न करता, कर्जदाराच्या धंद्याच्या व्यवस्थापनाच्या जबाबदारी ताब्यात घेणे.

**२. ह्या मार्गदर्शक तत्वाचा उद्देश**

ह्या मार्गदर्शक तत्वांचे उद्देश म्हणजे, सिक्युरिटायझेशन किंवा रिकस्ट्रक्शन कंपन्यांच्या कृतीमध्ये उचितपणा, पारदर्शकता व अभेदभाव व नियंत्रण आणणे आणि एसएआरएफएईएसआय अधिनियमाच्या कलम ९(अ) खाली एससी/आरसीद्वारा, कर्जदाराच्या धंद्याच्या व्यवस्थापनाचा ताबा घेताना किंवा बदल करताना, तपासणी व समतोल ह्यांची एक प्रणाली तयार करणे. एसएआरएफएईएसआय अधिनियम, २००२ च्या कलम ९(अ) खाली दिलेल्या अधिकारांचा वापर करताना एससी/आरसींनी ह्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे.

**३. एससी/आरसींचे अधिकार व ह्या मार्गदर्शक तत्वांची व्याप्ती**

कर्जदाराकडील थकबाकी वसुल करण्यासाठी, एससी/आरसींनी, ह्या मार्गदर्शक तत्वांच्या तरतुदींना अनुसरुनच, कर्जदाराच्या धंद्याच्या व्यवस्थापनेच्या ताबा घ्यावा किंवा त्यात बदल करावेत. कर्जदाराच्या धंद्याच्या व्यवस्थापनाचा ताबा घेऊ इच्छिणाऱ्या एससी/आरसी, एसएआरएफएईएसआय अधिनियमाच्या कलम १५ मधील तरतुदीचे पालन करुनच कर्जदाराच्या धंद्याच्या व्यवस्थापनाचा ताबा घेऊ शकतात. संपूर्ण थकबाकी वसूल झाल्यावर, एसएआरएफएईएसआय अधिनियमाच्या कलम १५(४) मध्ये दिल्यानुसार एससी/आरसी त्या धंद्याचे व्यवस्थापन कर्जदाराच्या ताब्यात देतील.

**४. व्यवस्थापनात बदल किंवा त्याचा ताबा घेण्याचा अधिकार वापरण्यासाठी पात्रतेच्या अटी**

परिच्छेद ५ मध्ये दिलेल्या परिस्थिती

अ) कर्जदाराकडून येणे असलेली रक्कम त्या कर्जदाराच्या एकूण मालमत्तेच्या २५% कमी नसल्यास एससी/आरसी त्या कर्जदाराच्या धंद्याच्या व्यवस्थापनात बदल करु शकतात अथवा ताबा घेऊ शकतात.
ब) जेथे कर्जदाराला एकापेक्षा अधिक प्रतिभूतित धनकोने (एससी/आरसी समाविष्ट) अर्थसहाय्य केले आहे व ७५% पेक्षा कमी नसलेल्या आउटस्टँडिंग सिक्युरिटी रिसीट धारण करणारे धनको (एससी/आरसी समाविष्ट) असे करण्यास राजी आहेत.

स्पष्टीकरणः

'एकूण मालमत्ता' म्हणजे, कृती करण्याच्या अगदी अलिकडील ऑडिट केलेल्या ताळेबंदात दर्शविलेली एकूण मालमत्ता (टोटल ॲसेट्स).

**५. व्यवस्थापनात बदल किंवा ताबा घेण्यासाठी आधार/कारणे**

वरील परिच्छेद ४ मध्ये दिलेल्या पात्रतेच्या अटींचे पालन केले असल्यास, पुढीलपैकी कोणत्याही एका आधारावर/कारणाने एससी/आरसींना कर्जदाराच्या धंद्याच्या व्यवस्थापनात बदल किंवा त्याचा ताबा घेण्याचा अधिकार असेलः

अ) संबंधित कर्ज-करारनाम्याखाली येणे असलेली रक्कम देण्यात कर्जदाराने जाणून बुजून कसुरी केली असल्यास;

ब) कर्जदाराच्या धंद्याचे व्यवस्थापन, धनकोंच्या (एससी/आरसी समाविष्ट) हितसंबंधावर विपरीत परिणाम करणारे आहे किंवा धनकोंच्या हितसंबंधावर विपरीत परिणाम करणारे प्रसंग टाळण्यासाठी योग्य उपाय योजण्याची टाळाटाळ करत आहे ह्याबाबत एससी/आरसींचे समाधान झाले असल्यास;

क) कर्जदाराचे व्यवस्थापन, धंदा यशस्वीपणे करण्यात सक्षम नसून त्यामुळे तोटा/एससी/आरसीची थकबाकी न देता येणे किंवा कर्जदाराच्या धंद्याचे व्यवस्थापनात व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव असणे किंवा कर्जदाराच्या धंद्यामधील मुख्य व्यवस्थापकीय व्यक्तिची नेमणुक, ती जागा रिकामी झाल्यापासून एक वर्षापेक्षा अधिक काळ रिकामी राहिल्याने, कर्जदाराच्या धंद्यावर किंवा एक प्रतिभूतित धनको म्हणून एससी/आरसीच्या हितसंबंधांवर विपरीत परिणाम होत आहे ह्याबाबत एससी/आरसीचे समाधान झाले असल्यास;

ड) प्रतिभूतित धनकोंच्या (एससी/आरसीसह) पूर्व परवानगीशिवाय कर्जदाराने, त्या एससी/आरसीकडे प्रतिभूतित केलेल्या मालमत्तेचा १०% किंवा अधिक भाग (एकूण) विकला, विल्हेवाट लावल्यास, गहाण किंवा लिएनखाली ठेवला असल्यास;

ई) कर्जदाराने स्वीकारलेल्या परतफेडीच्या अटींनुसार तो कर्जदार त्याचे कर्ज फेडण्यास असमर्थ असण्याबाबत पुरेशी कारणे/आधार असल्यास;

फ) एससी/आरसीच्या संमतीशिवाय त्या कर्जदाराने त्याच्या धनकोंबरोबर कोणताही करार किंवा समझौता केला असून एससी/आरसीच्या हितसंबंधावर त्याचे विपरीत परिणाम होत असल्यास किंवा कर्जदाराने नादारीची कोणतीही कृती केली असल्यास;

ग) कर्जदाराच्या उलाढालीच्या १०% किंवा त्यापेक्षा अधिक असलेला धंदा/व्यवसाय त्याने बंद केल्यास किंवा बंद करण्याची धमकी दिल्यास;

ह) कर्जदाराच्या धंद्यासाठी आवश्यक किंवा पायाभूत असलेले सर्व ॲसेट्स किंवा त्यांच्या लक्षणीय भागाचा कर्जदाराच्या कृतीमुळे ऱ्हास झाला असल्यास;

आय) कर्जदाराच्या धंद्याचे सर्वसामान्य स्वरुप किंवा व्याप्ती, कार्यकृती, व्यवस्थापन, नियंत्रण किंवा मालकी ह्यात लक्षणीय बदल झाला असून, एससी/आरसीच्या मते, त्याचा, कर्जाच्या परतफेडीवर विपरीत परिणाम होत असल्यास;

जे) कर्जदाराच्या धंद्यामधील प्रायोजक किंवा संचालक किंवा भागीदार ह्यादरम्यान गंभीर वाद निर्माण झाल्याने त्यामुळे कर्जदाराच्या कर्जफेड क्षमतेवर विपरीत परिणाम होत असण्याबाबत एससी/आरसीचे समाधान झाले असल्यास;

के) ज्यासाठी कर्ज घेतले गेले ते ॲसेट मिळविण्यास कर्जदाराला अपयश आले असल्यास किंवा तो निधी सांगितलेल्या हेतूसाठी न वापरला गेल्यास किंवा निधी दिलेल्या ॲसेट्सची वासलत लावून आलेल्या उत्पन्नाचा गैरवापर किंवा अफरातफर केली गेल्यास;

ल) धनकोंकडे प्रतिभूती म्हणून ठेवलेल्या मालमत्तेबाबत कर्जदाराने केलेले लबाडीचे व्यवहार;

<u>स्पष्टीकरण - अः</u> ह्या परिच्छेदापुरते, येणे असलेल्या रकमेची परतफेड करण्यामधील कसुरीमध्ये पुढील गोष्टी येतात -

अ) पुरेसा कॅश फ्लो आणि इतर स्त्रोतांची उपलब्धता असूनही थकबाकी न देणे, किंवा
ब) थकबाकी देणे टाळण्यासाठी, 'धनको/कॉन्सॉर्टियम सभासद नसलेल्या बँकांमार्फत व्यवहार करणे' किंवा
क) कसुरी करणाऱ्या एककाचे नुकशान होईल अशा प्रकारे निधी काढून घेणे किंवा अफरातफर/एससी-आरसी संबंधीची खोटी रेकॉर्ड्स तयार करणे

<u>स्पष्टीकरण - बः</u> कर्जदार जाणुनबुजून कसुरी करणारा आहे काय ह्याबाबतचा निर्णय एससी/आरसी त्याची पूर्वकामगिरी विचारात घेऊन ठरवितील .एखाद्या क्षुल्लक व्यवहारावरुन/प्रसंगावरुन नव्हे. जाणुनबुजून केलेली कसुरी ही मुद्दाम, जाणीवपूर्वक व पध्दतशीर अशी असली पाहिजे,

**६. व्यवस्थापनात बदल किंवा ताबा घेण्याबाबतचे धोरण**

अ) प्रत्येक एससी/आरसी, तिच्या संचालक मंडळाच्या मंजुरीने, कर्जदाराच्या धंद्याच्या व्यवस्थापनात बदल किंवा ताबा घेण्याबाबत धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे तयार करुन तिच्या कर्जदारांना ह्याबाबत जाणीव करुन देईल.

ब) अशा धोरणामध्ये सर्वसामान्यः पुढील बाबी असतीलः

१) कर्जदाराच्या धंद्याच्या व्यवस्थापनात बदल किंवा ताबा घेणे हे, त्या एससी/आरसीने नेमणूक केलेल्या स्वतंत्र सल्लागार समितीने त्या प्रस्तावाची छाननी केल्यानंतर केले जाईल. ह्या समितीत, तांत्रिक/वित्त/कायदा ह्यांची पार्श्वभूमी असलेले व्यवसायिक असतील. आणि कर्जदाराच्या आर्थिक स्थितीचे मूल्यामापन, त्याच्याकडून कर्जवसुली होण्यास लागणारा कालावधी, कर्जदाराची भविष्यातील यशाची संभाव्यता, आणि इतर बाबी ह्यांचे मूल्यमापन करुन, एससी/आरसीकडे शिफारस करतील की त्यांनी कर्जदाराच्या धंद्याच्या व्यवस्थापनात बदल करावा किंवा ताब्यात घ्यावा आणि असे केल्यासच थकबाकी वसुल होण्यासाठी तो धंदा परिणामकारक रितीने चालेल;

२) त्या एससी/आरसीचे दोन स्वतंत्र संचालक असलेल्या संचालक मंडळाने, आणि विद्यमान परिस्थित त्या कर्जदाराच्या धंद्याच्या व्यवस्थापनात बदल किंवा ताबा घेणे आवश्यक असल्याचे ठरविण्यापूर्वी, स्वतंत्र सल्लागार समितीच्या शिफारशींवर विचार करुन त्याबाबतचा निर्णय इतिवृत्तात नोंद करुन ठेवावा.

३) एससी/आरसीने, कष्टपूर्वक माहिती गोळा करुन, त्या कर्जदारावर कर्जफेड करण्यात अपयश का आले त्याबाबतची परिस्थिती शोधून काढावी आणि कर्जदाराच्या धंद्याच्या च्यवस्थापनात बदल किंवा त्याचा ताबा घेण्याचा निर्णय आवश्यक का झाला हेही शोधावे.

४) एससी/आरसीने, कर्जदाराचा धंदा परिणामकारक रितीने चालविण्याबाबतची एक योजना तयार करुन, त्यासाठी त्याचे व्यवस्थापन ताव्यात घेण्यासाठी सुयोग्य असे अधिकारी/एजन्सीज्ची नेमणूक करावी. त्यामुळे दिलेल्या कालावधीमध्ये कर्जदाराची थकबाकी वसुल होईल.

५) अशा योजनेमध्ये पुढील बाबींचा समावेश असावा, वरील परिच्छेद ३ अनुसार, कर्जदाराला त्याच्या धंद्याचे व्यवस्थापन परत देण्याबाबतची कार्यरीत, एससी/आरसीद्वारा व्यवस्थापनात बदल किंवा ताबा घेतेवेळी असलेले कर्जदाराचे हक्क व दायित्वे, त्या एससी/आरसीच्या वतीने धंद्याच्या व्यवस्थापनाच्या ताबा घेतेवेळी, ताबा घेणाऱ्या व्यवस्थापनाचे हक्क व दायित्वे एससी/आरसीद्वारे नवीन व्यवस्थापनाला स्पष्ट करण्यात यावे की, त्यांचे भूमिका ही केवळ, कर्जदाराचा धंदा समजसपणे चालविला जाऊन त्या एससी/आरसीची कर्ज थकबाकी वसुल करण्यापुरतीच सीमित आहे.

स्पष्टीकरणः स्वतंत्र सल्लागार समितीच्या(आयएसी) सभासदांचे स्वातंत्र्य अबाधित राहील ह्याची खात्री होण्यासाठी त्या सभासदांचा एससी/आरसीशी कोणत्याही बाबतीत संबंध असू नये आणि आयएसीचे सभासद म्हणून मिळणाऱ्या मानधना व्यतिरिक्त त्यांना अन्य कोणत्याही आर्थिक लाभ दिला जाऊ नये.

**७. व्यवस्थापनात बदल किंवा ताबा घेण्यासाठी कार्यरीत**

अ) व्यवस्थापनात बदल किंवा ताबा घेण्यासाठी, एससी/आरसी, त्याबाबतचा इरादा दर्शविण्णारी आणि त्याच्या हरकती मागविणारी ६० दिवसांची नोटिस कर्जदाराला पाठवेल.

ब) कर्जदाराच्या काही हरकती असल्यास, त्यावर आयएसी विचार करील व त्यानंतर त्या हरकती व आयएसीच्या शिफारशी त्या एससी/आरसीच्या संचालक मंडळ, तो नोटिस-कालावधी संपल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत एक रीझन्ड आदेश पास करील व ह्यात त्या एससी/आरसीचा कर्जदाराच्या धंद्यातच्या बदल करण्याच्या किंवा ताबा घेण्याचा निर्णय असेल व तो कर्जदाराला कळविला जाईल.

**८. अहवाल पाठविले**

परिपत्रक डीएनबीएस(पीडी)सीसी. क्र.१२/एससीआरसी/१०.३०.०००/२००८-२००९ दि.सप्टेंबर २६, २००८. च्या तरतुदीनुसार, कर्जदाराकडून थकबाकी वसुल करण्यासाठी कर्जदाराच्या धंद्याच्या व्यवस्थापनात बदल किंवा ताबा घेण्याची कारवाई करणाऱ्या एससी/आरसींनी ह्या बँकेकडे तसा अहवाल पाठवावा.

**९.** अधिसूचना डीएनबीएस (पीडी - एससी/आरसी) ७ /सीजीएम(एएसआर)/२०१० दि. एप्रिल २१, २०१० च्या तरतुदीनुसार 'दि सिक्युरिटायझेशन कंपनीज अँड रिकन्स्ट्रक्शन कंपनीज (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे अँड निदेश, २००३' चा परिच्छेद ७(२) सोबत जोडले आहेत.

आपला,

(ए.एस. राव)

प्रभारी मुख्य व्यवस्थापक

सोबत जोडलेले - २

**रिझर्व बँक ऑफ इंडिया**
**गैर बँकिंग पर्यावेक्षण**
**केंद्रीय कार्यालय**
**वर्ल्ड ट्रेड सेंटर**
**मुंबई - ४०० ००५**

**अधिसूचना  डीएनबीएस (पीडी - एससी/आरसी)क्र. ७ /सीजीएम(एएसआर)/-२०१० दि. एप्रिल २१, २०१०**

**सिक्युरिटायझेशन कंपन्या व रिकन्स्ट्रक्शन**
**कंपन्या (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे आणि निदेश, २००३**

रिझर्व बँक सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक वाटल्याने आणि देशाच्या फायद्यासाठी वित्तीय प्रणालीचे विनियमन करण्यास रिझर्व बँकेला मदत करण्याच्या हेतूसाठी, आणि सिक्युरिटायझेशन किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांचे व्यवहार गुंतवणुकदारांच्या हितसंबंधांना किंवा अशा सिक्युरिटायझेशन कंपनी किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपनीच्या हितसंबंधाना मारक ठरण्यास प्रतिबंध करण्यासाठी, रिझर्व बँक, 'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन कंपन्या (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे आणि निदेश, २००३' (ह्यानंतर ह्यांना मार्गदर्शक तत्वे म्हटले आहे) च्या कलम (३) च्या उपकलम (१) च्या खंड (ब) खाली मिळआलेल्या अधिकारांचा वापर करुन व सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम २००२ची अंमलबजावणी करुन निदेश देत आहे की 'सिक्युरिटायझेशन कंपन्या आणि रिकन्स्ट्रक्शन कंपन्या (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे आणि निदेश, २००३' (ह्यानंतर ह्यांना मार्गदर्शक तत्वे असे म्हटले आहे) ही पुढीलप्रमाणे सुधारित असतीलः-

१) ह्या मार्गदर्शक तत्वांचा परिच्छेद ७(२) खालीप्रमाणे प्रतिस्थापित केला जाईलः

**'(२) (१) व्यवस्थापनात बदल किंवा त्याचा ताबा घेणे**

सिक्युरिटायझेशन किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपनी, वेळोवेळी सुधारित केलेल्या परिपत्रक डीएनबीएस /पीडी (एससी/आरसी) क्र. १७ /२६.०३.००१/२००९-१० दि. एप्रिल २१, २०१० मधील सूचनांना अनुसरुन ह्या अधिनियमाच्या कलम ९(अ) मध्ये विहित केलेले उपाय योजील.

**(२)  कर्जदाराच्या धंद्याची संपूर्णतः किंवा अंशतः विक्री करणे किंवा लीजवर देणे**

ह्या बँकेने त्याबाबत आवश्यक ती मार्गदर्शक दिल्याशिवाय कोणतीही सक्युरिटायझेशन कंपनी किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपनी ह्या अधिनियमाच्या कलम ९(ब) मध्ये विहित केलेले उपाय योजणार नाही.

(ए.एस. राव)

प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक